# धर्मप्रांतीय उपासना आयोग, वसई

## पुनरूत्थान सहावा रविवार - २२ मे २०२२

## श्रद्धावंतांच्या प्रार्थना

धर्मगुरू ः माझ्या बंधू भगिनींनो, ख्रिस्ताच्या पुनरूत्थानाच्या आनंदासह आपण आपल्या परमेश्वर पित्याकडे प्रार्थना करू या. त्याच्या अतिप्रिय पुत्राच्या प्रार्थना त्याने ऐकल्या आणि स्वीकारल्या तो आपल्या मागण्या पूर्ण करील असा विश्वास बाळगू या.

प्रतिसाद ः प्रभो, आमची प्रार्थना ऐक.

१. आपले पोप फान्सिस, आर्चबिशप फेलिक्स, धर्मगुरू व व्रतस्थ ह्यांना प्रभूचा प्रेमाचा व शांतीचा संदेश जगभर पसरविण्यास सामर्थ्य व चांगले आरोग्य लाभावे म्हणून आपण प्रार्थना करू या.

२. आपल्या राजकीय नेत्यांना देशात सर्व धर्म स्नेहभाव व बंधुत्वाची भावना वाढीस लागण्यासाठी सतत प्रेरणा मिळावी म्हणून आपण प्रार्थना करू या.

३. प्रभू येशूच्या प्रीतीत राहणे म्हणजे सेवाभावी जीवन जगून शांती, क्षमा व समेटाचा मार्ग स्वीकारणे होय. परस्परांवर प्रेम करण्याचे सामर्थ्य आम्हाला मिळावे म्हणून आपण प्रार्थना करू या.

४. बायबल वाचन, कौटुंबिक रोझरीची प्रार्थना, मिस्सावली व साक्रामेंताची आराधना ह्याद्वारे आपणास ख्रिस्ताच्या प्रेमाचा जवळून अनुभव घेता यावा म्हणून आपण प्रार्थना करू या.

५. आपल्या धर्मग्रामातील सर्वांवर विशेषकरून जे आजारी आहेत अशावर प्रभूचा वरदहस्त असावा, कोरोनामुक्त वातावरणात आपल्याला नवीन आध्यात्मिक उपक्रम राबविता यावेत तसेच सर्व प्रकारच्या नैसर्गिक आपत्ती पासून आपले रक्षण व्हावे म्हणून आपण प्रार्थना करू या.

थोडा वेळ शांत राहून आपण आपल्या वैयक्तिक गरजांसाठी प्रार्थना करू या.

धर्मगुरू ः हे स्वर्गीय पित्या, तुझ्या लोकांच्या जीवनातील अनेक गरजांची तुला जाणीव आहे. तुझ्यावर विश्वास ठेवणा-या सर्वांच्या प्रार्थना ऐक आणि त्यांचा स्वीकार कर. ही प्रार्थना आमच्या प्रभूख्रिस्ताद्वारे करतो. आमेन.